Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A+' Grade

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ+' दर्जा प्राप्त
Office : Director, Board of Examinations & Evaluation
कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२६-२७/ 897                                                  दिनांक : ०१.१०.२०२६

**परीक्षा शुल्क माफीबाबत अत्यंत तातडीचे पत्र**

**प्रति,**
**विभाग प्रमुख/प्राचार्य/संचालक,**
**सर्व शैक्षणिक विभाग/संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर**

विषय : सन २०२६ च्या दुष्काळसदृश्य तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत.

संदर्भ : १. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या सोबत दि. ०१.१०.२०२६ रोजी झालेली ऑनलाईन बैठक
२. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र. समिती २६/प्र.क्र.८२/मदत/२, दि. २५.०९.२०२६
३. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१६ यांचे पत्र क्र. उशिस/शिष्य-२०२६-अवर्षण-परीक्षा शुल्क-२०२६-२७/ई १३२१७१६, दि. ३०.०९.२०२६
४. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभाग यांचे पत्र क्र. विसहसं/ उशि/छत्रसंवि/स्वायत्त महा./२०२६-२७ दिनांक ०१.१०.२०२६

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी व संदर्भिय बैठक व शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, दिनांक ०१.१०.२०२६ रोजी दुपारी ठिक ४.०० वाजता मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्यासमवेत मा. कुलगुरू व इतर प्रशासकीय अधिकारी यांची ऑनलाईन बैठक झाली, बैठकीदरम्यान मा. मंत्री महोदयांनी राज्यातील दुष्काळसदृश्य परिस्थिती लक्षात घेऊन सर्व तालुक्यातील विद्यापीठ व उपपरिसरातील सर्व शैक्षणिक विभाग तसेच विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व महाविद्यालये / परिसंस्थामध्ये पदवी, पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमास शिक्षण घेत आहेत अशा परीक्षार्थींचे परीक्षा शुल्क स्वीकारण्यात येऊ नये असे ऑनलाईन बैठकीदरम्यान अवगत केले आहे.

वरील संदर्भीय पत्र क्र. ४ अन्वये कळविण्यात येते की, हिवाळी-२०२६ च्या ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या पदवी, पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ज्या परीक्षार्थींचे परीक्षा शुल्क स्विकारण्यात आलेले आहे अशा परीक्षार्थींची परीक्षा शुल्क परत करण्याविषयी शासनाचे स्पष्ट निर्देश प्राप्त झाल्यानंतर कळविण्यात येईल, तसेच जे परीक्षार्थी दि. ०१.१०.२०२६ रोजीनंतर परीक्षा आवेदनपत्र सादर करतील व परीक्षा शुल्क माफीसाठी पात्र आहेत अशा सर्व परीक्षार्थींना परीक्षा शुल्क आकारण्यात येऊ नये व परीक्षा आवेदनपत्र विना परीक्षा शुल्क स्विकारण्यात यावे.

तसेच जे परीक्षार्थी परीक्षा शुल्क माफीसाठी पात्र आहेत अशा सर्व परीक्षार्थींची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्र व प्रमाणपत्रानुसार भरुन विभाग प्रमुख/प्राचार्य/संचालक यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित करुन समन्वय कक्ष, राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर यांना शैक्षणिक विभाग/महाविद्यालय/परिसंस्थातील प्रतिनिधी मार्फत दि. १७.१०.२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेच्या आत पाठविण्यात यावी.

करिता, उपरोक्तप्रमाणे नोंद घेऊन कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

**प्रा. (डॉ.) बाबासाहेब एन. डोळे**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**सोबत :** **१) विवरणपत्र 'अ'**
**२) प्रमाणपत्र**
**३) हमीपत्र**
**४) SUMMERY SHEET**
**५) Annexure-I**

**या पत्राची पत्र माहितीस्तवः**

१. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर
२. मा. कुलगुरु महोदयांचे स्वीय सहायक, प्रशासकीय इमारत, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर.
३. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे स्वीय सहायक, प्रशासकीय इमारत, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर.
४. कक्ष प्रमुख, सर्व संबंधित कक्ष, राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर.

**(१) विवरणपत्र-'अ'**

**शैक्षणिक विभाग/महाविद्यालयाचे लेटर हेड**

**विभाग प्रमुख/प्राचार्य/संचालकांचे नाव :**

**भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक :**

**ई-मेल आयडी :**

**संदर्भ क्र.:** **दि. / /२०२६**

## विवरणपत्र-अ

सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशिलाचे विवरणपत्र.

| अ.क्र. | सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी भरलेली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्तीसाठी आवश्यक रक्कम | सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दिले आहेत अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्ती साठी आवश्यक रक्कम | एकुण विद्यार्थी संख्या | एकुण प्रतिपुर्तीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

**प्राचार्य/विभाग प्रमुख**
**नाव**
**शिक्का**

(शैक्षणिक विभाग/महाविद्यालयाचे लेटर हेड)

विभाग प्रमुख/प्राचार्य/संचालकांचे नाव :

भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक :

ई-मेल आयडी :

संदर्भ क्र.: दि. / /२०२६

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीतील विद्यार्थी हे दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील रहिवाशी आहेत. तसेच त्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लक्ष मर्यादेपर्यत आहे. त्यामुळे ते परीक्षा शुल्क माफी साठी पात्र आहेत. विद्यार्थ्यांनी शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १००% परीक्षा शुल्क माफी सवलतीसाठी अर्ज भरलेला नाही याची खात्री केलेली आहे.

तरी दुष्काळग्रस्त भागातील एकुण विद्यार्थी संख्या ............... व रक्कम रु. ........................ एवढी आहे

करिता, प्रमाणित करण्यात येत आहे.

प्राचार्य/विभाग प्रमुख
नाव
शिक्का

**(३) हमीपत्र**
**List Sr.No.:**

# हमीपत्र
## (परीक्षा शुल्क माफीसाठी सन २०२६-२७)

**मी खाली सही करणार**

विद्यार्थ्याचे संपुर्ण नावः ____________________
पी.आर.एन. क्रमांक : ____________________
अभ्यासक्रमः ____________________ सत्रः ____________________
आधार क्रमांकः ____________________
महाविद्यालयाचे/संस्थेचे नावः ____________________
परीक्षा आवेदनपत्र क्रमांकः ____________________ मोबाईल क्र.: ____________________
कायमचा निवासी पत्ताः ____________________
गाव/शहरः ____________________ तालुकाः ____________________ जिल्हाः ____________________

**मी याव्दारे सत्यप्रतिज्ञेवर लिहून देतो/देते कीः**

१. महाराष्ट्र शासनाने सन २०२६-२७ मधील दुष्काळसदृश्य परिस्थितीमुळे मदत व पुनर्वसन विभागाच्या दि. २५.०९.२०२६ रोजीच्या शासन निर्णय क्र:- समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२ अन्वये घोषित केलेल्या दुष्काळसदृश्य तालुक्यामध्ये माझे कुटुंब वास्तव्यास असून आम्ही तेथील मूळ रहिवासी आहोत.
२. मी, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत होणाऱ्या परीक्षांचे परीक्षा शुल्क माफ होण्यासाठी अर्ज सादर करत आहे.
३. मी, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता महाराष्ट्र शासनाच्या अथवा केंद्र शासनाच्या इतर कोणत्याही प्रकारच्या शिष्यवृत्ती, शिक्षण शल्क/परीक्षा शुल्क सवलत (उदा. महाडीबीटी मार्फत मिळणारी शिष्यवृत्ती किंवा तत्सम योजना) यांमधून परीक्षा फी प्रतिपूर्तीचा लाभ घेतलेला नाही व चालू शैक्षणिक वर्षात असा कोणताही लाभ मी घेणार नाही.
४. सदर हमीपत्रात दिलेली सर्व माहिती माझ्या वैयक्तिक माहिती व समजुतीनुसार पूर्णतः खरी व बिनचूक आहे. भविष्यात मी शासनाच्या इतर योजनेतून परीक्षा फीचा लाभ घेतल्याचे किंवा माहिती खोटी/अयोग्य असल्याचे आढळल्यास माझाकडून संपूर्ण परीक्षा शुल्क दंडासह वसूल केले जाईल. तसेच माझ्याविरुध्द होणाऱ्या प्रशासकीय कार्यवाहीस मी व्यक्तिशः जबाबदार राहील.

ठिकाणः
दिनांकः / /२०२६

स्वाक्षरी
विद्यार्थ्याचे नावः ____________________

## पालकांचे संमतीपत्र

मी श्री./श्रीमती ____________________ याव्दारे हमी देतो/देते की, माझा मुलगा/मुलगी ____________________ याने/हिने वर नमूद केलेल्या हमीपत्रातील सर्व अटी व शर्तींचे वाचन केले असून त्या मला पूर्णतः मान्य आहेत.

ठिकाणः
दिनांकः / /२०२६

स्वाक्षरी
पालकाचे नावः ____________________

## कार्यालयीन छाननी व पडताळणी (महाविद्यालयासाठी)

उपरौक्त नमूद विद्यार्थ्याने सादर केलेल्या माहितीची, दुष्काळसदृश्य तालुक्याच्या रहिवासी पुराव्याची आणि शिष्यवृत्ती न घेतल्याबाबतच्या विहित अटींची पडताळणी करण्यात आली आहे. सदर विद्यार्थी परीक्षा शुल्क माफीच्या सवलतीस पात्र/अपात्र आहे.

लिपिक / तपासणी अधिकारी
(स्वाक्षरी व शिक्का)

प्राचार्य / विभागप्रमुख
(स्वाक्षरी व शिक्का)

# (DEPARTMENT / COLLEGE LETTER HEAD)

## NO. OF STUDENTS & FEES SUMMERY SHEET

### REFUND EXAMINATION FEES OF NOV / DEC, 2026 EXAMINATIONS

| Sr. No. | Name of Examination | Semester | No. of Students | Total Examination Fees |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |
| 5 | | | | |
| 6 | | | | |
| 7 | | | | |
| 8 | | | | |
| 9 | | | | |
| 10 | | | | |
| 11 | | | | |
| 12 | | | | |
| 13 | | | | |
| 14 | | | | |
| 15 | | | | |
| Grand Total | | | | |

**Seal & Signature**
**Principal / Head**

(5) Annexure-I

## DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

### REFUND EXAMINATION FEES OF NOV/DEC, 2026 EXAMINATIONS

**HOD/Principal/Director Name:** ____________________________________________**Mobile No.:** _____________________

**Dept./College/Institute Email ID:** _______________________________________________**Dept./College Code:** ________

**Name of Dept./College/Institute:** __________________________________________________________________________

| Sr. No. | Name of Student (Surname First) | P.R.N. Number | Name of Course | Semester | Village/City | Taluka | District | Exam Fee |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | |
| 6 | | | | | | | | |
| 7 | | | | | | | | |
| 8 | | | | | | | | |
| 9 | | | | | | | | |
| 10 | | | | | | | | |

**Seal & Signature**
**Principal/Head**

महाराष्ट्र शासन
सहसंचालक (उच्चशिक्षण) छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर
पदमपूरा, देवगिरी महाविद्यालय जवळ, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर.
Web: www.jdheaur.info Email Id: jdheaur_2007@rediffmail.com
दूरध्वनी.०२४०-२३३१९१३ फॅक्स २३३१९१३

जा.क्र.विसहसं/उशि/छत्रसंवि/ स्वायत्त महा. /२०२६-२७/ दिनांक : ०१/१०/२०२६

**परिपत्रक**

प्रति,
कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
प्राचार्य,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान,
अध्यापक, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण महाविद्यालये छत्रपती संभाजीनगर विभाग.

विषय :- सन-२०२६ च्या खरीप हंगामातील Triger-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यातील दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करणेबाबत.

संदर्भ :- १. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२६-अवर्षण-परीक्षा शुल्क-२०२६-२७/ई१३२१७१६ दि.३०.०९.२०२६ .
२. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५,दिनांक १८.१०.१९९३
३. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र. समिती २६/प्र.क्र.८२/मदत /२ दि. २५.०९.२०२६

उपरोक्त विषयान्वये संचालनालयाचे पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, वरील संदर्भ क्रमांक 2 व 3 नुसार राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षा व परीक्षा मंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना लागू केलेली आहे. यामध्ये सार्वजनिक विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा समावेश आहे.

संदर्भ क्र. 3 शासन निर्णय नुसार सन 2026 च्या खरीप हंगामातील **Triger – 1** (प्रथम कळ) लागू झालेल्या 265 तालुक्यातील दुष्काळ जाहीर करून विविध उपाय योजना व सवलती लागू करण्यात आलेले आहेत, सदर शासन निर्णयांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागू केली आहे

त्या अनुषंगाने विद्यापीठ व महाविद्यालयातील संदर्भ 2 शासन निर्णय दिनांक 18 ऑक्टोबर 1993 च्या शासन निर्णयातील परिच्छेद 8 मध्ये नमूद केल्याप्रमाणे दुष्काळ सदृश्य तालुक्यातील सवलतीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदन पत्र विद्यापीठाकडे संदर्भ 2 शासन निर्णयातील नमूद केलेल्या प्रमाणपत्र स्वाक्षरी करून पाठवावे.

सन 2026-27 च्या दुष्काळग्रस्त सदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कपोटी भरलेल्या रकमेची प्रतिपुर्ती करण्यासाठी त्यांच्याकडून आलेले आवेदन पत्रावर प्रतिपूर्तीची रक्कमपणे गणना करून या कार्यालयाकडे आवश्यक रकमेची मागणी करावी

तसेच विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या 2026-27 च्या दुष्काळ सदृश्य तालुक्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा फी प्रतिपूर्ती करण्यासाठी महाविद्यालय निहाय आलेल्या आवेदन पत्रावरून प्रतिमूर्तीची रक्कम परिगणना करून या कार्यालयात सादर करावी

जेणेकरून महाविद्यालय व विद्यापीठाकडून प्राप्त माहितीची तपासणी करून संचालनालयाकडे मान्यते करिता तथा प्रतिकृती करिता सादर करण्यासाठी ची कार्यवाही करता येईल.

कोणत्याही परिस्थितीत दुष्काळ सदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता आपल्या स्तरावरून घेण्यात यावी.

सोबत, संदर्भपत्र व परीक्षा शुल्कमाफी संबंधातील विवरणपत्र व प्रमाणपत्र जोडण्यात येत आहे.

Digitally signed by
PANKAJA MADHAV WAGHMARE
Date: 01-10-2026 14:12:31
डॉ. पंकजा माधव वाघमारे
सहसंचालक (उच्च शिक्षण)
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

प्रत, मा. शिक्षण संचालक उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे -४११०१६
फोन नं. ०२०-२६१२२११९ Web: www.dhepune.gov.in Email : director.dhepune@nic.in

क्र.उशिंस / शिष्य-२०२६- अवर्षण-परीक्षा शुल्क- २०२६-२७/ई १३२१७१६ दिनांक ३० सप्टेंबर २०२६

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग.

२. कुलसचिव, सर्व सार्वजनिक विद्यापीठे.

**विषय- सन २०२६ च्या खरीप हंगामातील Triger-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यातील दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करणेबाबत**

संदर्भ- १. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एफईडी - १५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दि. १८.१०.१९९३

२. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र.समिती २६/प्र.क्र.८२ /मदत/ २, दि.२५.०९.२०२६.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये, राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षा व परीक्षामंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना लागू केली आहे. यामध्ये सार्वजनिक विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा समावेश आहे.

आता संदर्भिय शासन निर्णय क्रमांक २ नुसार, सन २०२६ च्या खरीप हंगामातील Triger-१(प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यातील दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागू केली आहे.

त्यानुसार आपल्या अधिनस्त संबंधीत दुष्काळसदृश्य तालूक्यातील महाविद्यालयांना खालील प्रमाणे सुचना देण्यात याव्यात.

१.संदर्भ क्रमांक १ येथील १८ ऑक्टोंबर, १९९३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दुष्काळ सदृश्य तालुक्यातील सवलतीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांन कडून महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदन पत्रे विद्यापीठाकडे संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयात नमुद केलेल्या प्रमाणपत्रावर सांक्षाकित करुन पाठवावे.

२. सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील पात्र विद्यार्थी शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यासाठी त्यांचेकडून आलेल्या आवेदन पत्रावरुन प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी.

३. तसेच विद्यापीठाने आपल्याकडे प्राप्त झालेल्या सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्ती करण्यासाठी महाविद्यालयनिहाय आलेल्या आवेदन पत्रावरून प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी .

४. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी महाविद्यालयांकडून / विद्यापीठांकडून आलेल्या माहितीची तपासणी करुन आवश्यक रक्कमेची माहिती संचालनालयाकडे सोबतच्या विवरणपत्र अ मध्ये सादर करावी. सदरची माहिती सादर केल्यानंतर संचालक स्तरावरुन सहसंचालक कार्यालयांना सदर योजनेसाठी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल व सहसंचालक स्तरावरुन संबंधित रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यात येईल.

५. कोणत्याही परिस्थितीत दुष्काळ सदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६

प्रत,-मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२

## विवरणपत्र - अ

सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशिलाचे विवरणपत्र.

(रक्कम रुपयात)

| अ.क्र. | सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी भरलेली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपुर्ती साठी आवश्यक रक्कम | सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दिले आहेत अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपुर्ती साठी आवश्यक रक्कम | एकूण विद्यार्थी संख्या | एकूण प्रतिपुर्तीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

स्वाक्षरी